**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २०.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**कळमणा पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १९.०६.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **'अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम'** राबविताना अंमली पदार्थ बाळगणारे, विकणारे ईसमांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, कळमणा मार्केट चिखली परिसरातील वैष्णवी ऑटोमोबाईल व सर्व्हिसींग सेंटरजवळ एका होंडा अॅक्टिवा क्र. एमएच ३४ एजी २०३६ मोपेडवर दोन इसम संशयास्पदरित्या दिसून आल्याने, त्यांना त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे १) सोम महेश बेडीया उर्फ कालखोर वय २९ वर्षे रा. का.प. मोतीझील, बदनापुरा, पोलीस थाना पुरानी छावनी, बदलापुर चौराहा, गोल पहाडी (मध्यप्रदेश), ह.मु.— न्यु ओमनगर, हनुमान मंदीर समोर, चंदा कालकोर यांचे घरी किरायाने, भरतवाडा, कळमणा, नागपूर २) असीम खान वल्द जमील खान वय ३४ वर्ष रा. गाव गुर्रा, नुरी मस्जिद जवळ, तहसील जौवरा, जि. मौरेना (मध्यप्रदेश) असे सांगीतले. पंचासमक्ष आरोपींजवळील बॅग व अॅक्टिवा मोपेडची झडती घेतली असता, बॅगमध्ये हिरवट काळसर फुले व फळे आलेला उग्र वास असणारा अंमली पदार्थ गांजा एकुण वजनी ४ किलो १६८ ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, दोन्ही आरोपी हे बाहेर राज्यातील असून, पैकी आरोपी क्र. २ याने उडीया येथून गांजा विकत आणला आहे व आरोपी क्र. १ हा गांजा विक्री करणेकरीता कळमणा येथे आलेला आहे असे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन गांजा, मोपेड व बॅग असा एकुण १,३०,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा खरेदी—विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि. कलीम पठाण, पोउपनि.

गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललित शेंडे, अविनाश ग्वालबंशी व अजय गटलेवार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०६.२०२६ चे ०१.४५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात रात्रगस्त पेट्रोलींग करीत असता, त्यांना म्हाॅडा चौक ते टायर चौक दरम्यान सार्वजनिक रोडवर उभ्या असलेल्या एका ट्रकचे शेजारी अंधारात एक इसम संशयास्पदरित्या दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव हर्ष उर्फ लल्ला संजु ब्रम्हे वय १८ वर्षे रा. नारी रोड, तक्षशिला नगर, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकू कि. ३००/— रू. चा मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. सागर बघेल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. शंकर निलपत्रेवार यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०६.२०२६ चे २१.५० वा. चे सुमारास, हिंगणा पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, व्याहाड—किन्ही सार्वजनिक रोडवर एक इसम ज्याने अंगात पांढरा शर्ट व काळा लोअर घातलेला असून तो शस्त्र बाळगून आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास ताब्यात घेऊन, त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शैलेष कवडूजी टापरे वय ३० वर्षे रा. वार्ड क्र. १, व्याहाड पोस्ट पेठ, ता. हिंगणा जि. नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत एक लोखंडी चाकू कि. २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. अनिल झाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. संदेश नाडे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. सहकलम ३७(१)(३)मुंपोका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०६.२०२६ चे ०६.०० वा. ते दिनांक १८.०६.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. ७, सरस्वती नगर, जानकी नगर, उदयनगर चौक, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती सोनल नामदेवराव येसकर वय २५ वर्ष हया त्यांचे राहते घराला कुलूप लावून आपले आईसह त्यांचे भावाकडे पुणे येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराची कडी तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ९५,०००/—रू. व सोन्याची चैन असा एकुण किंमती १,३१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. पंकज जाधव ७६२०३३९०२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** सौ. सिमरन सुनिल चाको, वय २८ वर्षे, रा. मार्टीन नगर, ए ब्लॉक क्र. १३९, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १८.०६.२०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ५ इंच, केस—काळे लांब, अंगात—निळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे पारडी :—** कु. निधी ताराचंद राजनिरे, वय २० वर्षे, रा. प्लॉट क्र. ८१, भवानी नगर, घनश्याम सायकल स्टोअर्स समोर, पारडी, नागपूर ही दिनांक १९.०६.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात—गुलाबी कुर्ती व निळ्या रंगाचा जिन्स तसेच पायात हिरव्या रंगाची चप्पल व डोळयावर गुलाबी चष्मा घातलेला आहे. सोबत काळया रंगाची बॅग आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**३) पोलीस ठाणे पारडी :—** माखनलाल भैयालाल पटले वय ४९ वर्षे रा. प्लॉट नं. २७, पोवारी नगर, वार्ड क्र. १, पारडी, नागपूर हे दिनांक १६.०६.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ३ इंच, डोळे—घारे, केस—काळे, अंगात—काळ्या पांढरे रंगाचा फुलशर्ट व हॉफपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— गळयावर मस्सा आहे.

**४) पोलीस ठाणे तहसील :—** मनोज कडूजी डुकरे वय २४ वर्षे रा. तहसील ऑफीसजवळ, हिंगणा, नागपूर हा दिनांक २८.०५.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे तहसील हद्दीतील मस्कासाथ, चुना ओळ येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, डोळे—काळे, केस—काळे, अंगात—शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.

   

सौ. सिमरन     कु. निधी     माखनलाल     मनोज

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

**दिनांक २१.०६.२०२६ ते २७.०६.२०२६ पर्यंत खालील दिलेल्या मार्गावर काम सुरू असुन नमुद मार्गावरून वाहतूक वळविण्यात आले आहे ते खालील प्रमाणे आहे.**

१. वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

**सदर अधिसुचना दिनांक ०४.०६.२०२६ रोजी पासून ते दि.०३.०७.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

२) वाहतूक परिमंडळ पारडी हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन प्रजापती नगर ते ट्रांसपोर्ट नगर पर्यत पिल्लर क्र ४P६३ ते ४P७७ कापसीखुर्द गाव चे गेट ते

कापसी पूलीया चौकी दरम्यान मेट्रो व्हाडक्टरचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर निर्माण काम कापसी खुर्द गाव चे गेट ते कापसी पूलीया चौकी पर्यत होणार असल्याने दोन्ही बाजूस नवीन सर्व्हिस रोड तयार करण्यात आले आहे. सदर काम मार्गाचे मध्यभागी रेल्वेचे बांधकाम करण्यात येणार असल्याने वाहतूक हि सर्व्हिस रोडने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**कापसी खुर्द गाव चे गेट ते कापसी पूलीया चौकी पर्यत जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- नागपूरकडून भंडारा व भंडाराकडून नागपूरकडे जाणारी वाहतूक हि नवीन तयार करण्यात आलेले सर्व्हिस रोडने जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक ०६.०६.२०२६ ते दिनांक ३०.०६.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

**३)** वाहतूक परिमंडळ लकडगंज अंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण तर्फे एन.सी.सी लिमिटेड नागपूर कडुन पाचपावली पोलीस ठाणे ते कमाल चौक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यात येणार आहे . करीता नमुद कामादरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**पोलीस ठाणे पांचपावली ते कमाल चौककडे जाणारी संपूर्ण वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- **पोलीस ठाणे पांचपावली कडुन कमाल चौककडे जाणारी संपूर्ण वाहतूक सिंधु महाविद्यालय समोरून डावे वळण घेवुन कमाल टॉकीज वॉल कम्पाउंड कडुन डावे वळण घेवुन सरळ कमाल चौक कडे सोईनुसार जातील.**

**सदर अधिसूचना दिनांक १४.०६.२०२६ ते दिनांक १३.०७.२०२६ पर्यत अंमलात राहील.**

**४)** वाहतूक परिमंडळ एम.आय.डी.सी. हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन लोकमान्य नगर ते हिंगणा गावापर्यत महाराष्ट्र मेट्रो रेलची उभारणी करणार आहे. सदर कामादरम्यान झोन चौक ते आय.सी. चौक पर्यत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**इंडियन ऑयल पेट्रोल पंप ते झोन चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- हिंगणा कडून नागपूर कडे जाणारी वाहतूक हि इंडियन ऑयल पेट्रोल पंप कडुन सर्व्हीस रोडने झोन चौक पर्यत जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक १४.०६.२०२६ ते दिनांक ०७.०७.२०२६ पावेतो अमंलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे**. )

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर.